**आकाशवाणी नागपूर,**

**प्रादेशिक वृत्त विभाग**

**प्रादेशिक बातम्या (मराठी-वेळ सायंकाळी ०६.००)**

**गुरुवार दिनांक ०८ जानेवारी २०२६**

**ठळक बातम्या**

1. **जनगणनेच्या पहिल्या टप्प्यासाठी केंद्र सरकारकडून अधिसूचना जारी.**
2. **अंबरनाथ मधल्या कॉंग्रेसच्या निलंबित नगरसेवकांना पक्षप्रवेश दिल्यामुळे भाजपचा दुटप्पी चेहरा उघड झाल्याची कॉंग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांची टीका.**
3. **राज्यातील 29 महानगरपालिका निवडणूक क्षेत्रात 15 जानेवारी रोजी सुट्टी जाहीर.**
4. **ज्येष्ठ पर्यावरण तज्ज्ञ, पद्मभूषण डॉ. माधव गाडगीळ यांचं निधन.**

-----------------------------------------------

**जनगणना**

केंद्र सरकारनं जनगणनेच्या पहिल्या टप्प्यासाठी अधिसूचना जारी केली आहे. या वर्षी १ एप्रिल ते ३० सप्टेंबर या कालावधीत देशातली सर्व राज्यं आणि केंद्रशासित प्रदेशांमध्ये घरांची गणना करण्यात येईल. त्या आधीचे १५ दिवस नागरिकांना स्वतःहून या घरांच्या गणनेची माहिती देता येईल. दुसऱ्या टप्प्यात फेब्रुवारी २०२७ मध्ये लोकसंख्येची गणना होईल. मोबाइल ॲपद्वारे केली जाणारी ही देशातील पहिली जनगणना असेल.

-----------------------------------------------

**सपकाळ / विजय वडेट्टीवार**

अंबरनाथमधील काँग्रेसच्या १२ नगरसेवकांनी कोणाशीही चर्चा न करता घेतलेली भूमिका अत्यंत चुकीची असून पक्षाच्या निदर्शनास आल्यानंतर त्यांना सज्जड दम देत पक्षातून बडतर्फ करण्यात आले आहे. काँग्रेसने कारवाई केली पण भाजपाने मात्र त्यांना पक्षात सामावून घेतले, यातून भाजपाचा दुटप्पी चेहरा उघड झाला आहे. सत्तेसाठी भाजप कोणत्याही पक्षाशी युती करत आहे अशी टीका प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी आज केली. अंबरनाथ नगरपालिकेतल्या काँग्रेसच्या नवनिर्वाचित १२ नगरसेवकांनी आज भाजपमध्ये प्रवेश केला त्या पार्श्वभूमीवर सपकाळ आज जालना इथं पत्रकारांशी बोलत होते. काँग्रेसमुक्त भारत

करण्याच्या नादात भाजपाच काँग्रेसयुक्त झाला आहे, अशी टीका त्यांनी यावेळी केली.

***(होल्ड बाईट - सपकाळ - सेकंद)***

दरम्यान पक्षाच्या चिन्हावर निवडून आलेल्या प्रतिनिधींनी असा निर्णय घेणे योग्य नसल्याच मत काँग्रेस नेते विजय वडेट्टीवार यांनी व्यक्त केल. या प्रकरणामुळे पक्षाचे नुकसान होत असून त्यावर अंतर्गत चर्चा सुरू असल्याचही त्यांनी स्पष्ट केल. नागपुरात ते पत्रकारांशी बोलत होते.

राज ठाकरे आणि अजित पवार यांच्यातील आरोपांवर बोलताना, हे आरोप निवडणुकीपुरते मर्यादित असल्याची भावना जनतेत निर्माण होत असल्याचं वडेट्टीवार म्हणाले.

***(होल्ड बाईट - विजय वडेट्टीवार)***

'पैसे वाटपाच्या आरोपांबाबत ठोस पुरावे नसल्याचे सांगत, राज्यात फोडाफोडीच्या राजकारणामुळे महाराष्ट्राची प्रतिमा मलीन झाल्याची टीका वडेट्टीवार यांनी केली

---

**फडणवीस प्रचार**

आगामी महानगरपालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर प्रचार सभांना वेगाला असून आज भाजपाचे ज्येष्ठ नेते आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची स्वागत लॉन सिविल लाईन इथं संध्याकाळी पावणेसात वाजता प्रगट मुलाखत आयोजिण्यात आली असून, त्यानंतर **आठ** वाजता नंदनवन इथं तर **नऊ** वाजता रामनगर इथं प्रचार सभा होणार आहे.

---

**15 जानेवारी सुट्टी**

राज्यातील २९ महानगरपालिकांच्या निवडणुकीसाठी गुरुवार, दिनांक १५ जानेवारी रोजी मतदान होणार आहे. या पार्श्वभूमीवर संबंधित मतदान क्षेत्रात 15 जानेवारी रोजी सार्वजनिक सुट्टी जाहीर करण्यात आल्याची अधिसूचना राज्य शासनाने प्रसिद्ध केली आहे. अधिसूचना सर्व विभागांच्या प्रशासकीय नियंत्रणाखालील सर्व शासकीय, निमशासकीय कार्यालये, महामंडळे, मंडळे इत्यादींच्या निदर्शनास आणण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. ही सार्वजनिक सुट्टी संबंधित महानगरपालिका निवडणूक क्षेत्रातील मतदारसंघाबाहेर कामानिमित्त असलेल्या मतदारांनाही लागू राहणार आहे. मतदारांनी मतदानासाठी लोकशाहीच्या उत्सवात सक्रिय सहभाग नोंदवावा, असे आवाहन प्रशासनाच्या वतीने करण्यात आले आहे.

---

**विशेष मुलाखत**

प्रगती या व्यासपीठामुळं देशातल्या पायाभूत सुविधांच्या अंमलबजावणीला गती आल्याचं प्रतिपादन माजी कॅबिनेट सचिव आणि नीती आयोगाचे सदस्य राजीव गौबा यांनी केलं आहे. आकाशवाणीला दिलेल्या विशेष मुलाखतीत त्यांनी ही माहिती दिली. प्रगतीच्या अंतर्गत आढावा घेतला जात असलेल्या काही प्रकल्पांची निवड खुद्द प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी केली आहे. त्यात नवी मुंबई विमानतळ, चिनाब नदीवरचा रेल्वेचा पूल, आसाममधला बोगीबीळ पूल यांचा समावेश असल्याचं गौबा यांनी सांगितलं. आकाशवाणीच्या एफएम गोल्ड आणि इतर वाहिन्या तसंच NEWSONAIROFFICIAL या युट्युब चॅनलवर आणि NewsOnAIR ॲपवर आज रात्री साडे ९ वाजता ही पूर्ण मुलाखत ऐकता येईल.

---

**सूचना आणि हरकती**

केंद्र सरकारनं कीटकनाशक व्यवस्थापन विधेयक, २०२५ वर संबंधित लोकांकडून, सूचना आणि हरकती मागवल्या आहेत. हे विधेयक कीटकनाशकांशी संबंधित, जुन्या दोन कायद्यांची जागा घेईल. विधेयकाचा मसुदा सरकारनं प्रसिद्ध केला आहे. शेतकऱ्यांना, दर्जेदार कीटकनाशकं उपलब्ध व्हावीत, तसंच कीटकनाशकांशी संबंधित किरकोळ गुन्हे फौजदारी कलमांमधून वगळणं असा हा विधेयकाचा हेतू आहे. संबंधितांना चार फेब्रुवारी पर्यंत आपल्या सूचना पाठवायच्या आहेत.

---

**डॉ.माधव गाडगीळ निधन**

ज्येष्ठ पर्यावरणतज्ज्ञ डॉ. माधव गाडगीळ यांचं आज पुण्यात दीर्घ आजाराने निधन झालं, ते ८३ वर्षांचे होते. पश्चिम घाटातील जैवविविधतेच्या संवर्धनासाठी त्यांनी दिलेलं योगदान अतुलनीय आहे. पश्चिम घाटाच्या संरक्षणासाठी त्यांनी तयार केलेला 'गाडगीळ अहवाल' पर्यावरण संवर्धनासाठी एक महत्त्वपूर्ण आणि दूरदर्शी दस्तऐवज ठरला. पर्यावरण क्षेत्रातील उत्तुंग कार्याबद्दल संयुक्त राष्ट्रांनी २०२४ मध्ये गाडगीळ यांना, 'चॅम्पियन्स ऑफ द अर्थ' या सर्वोच्च सन्मानाने गौरवलं होतं. गाडगीळ हे भारतातील जैवविविधतेच्या कायद्याचे शिल्पकार होते, असं सांगून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी त्यांना श्रद्धांजली अर्पण केली. तर गाडगीळ यांच्या निधनामुळे पर्यावरण संरक्षण चळवळीची मोठी हानी झाल्याची भावना उपमुख्यमंत्री अजित पवार

यांनी व्यक्त केली. केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी देखील गाडगीळ यांच्या निधनाबद्दल शोकभावना व्यक्त केल्या आहे.

-----------------------------------------------

**कैदी उपक्रम**

कैद्यांची शिक्षा संपल्यानंतर सामान्य जीवनात परतताना त्यांना रोजगार प्राप्त व्हावा, त्यांच्या हाताला काम मिळावं जेणेकरून ते पुन्हा गुन्हेगारी कडे परतू नये यासाठी भंडारा कारागृहात विविध उद्योगधंद्यांचं प्रशिक्षण कैद्यांना दिलं जात आहे. या उपक्रमाचा एक भाग म्हणून कारागृहात शेती देखील केली जाते. या शेतीत पिकवलेला भाजीपाला कैद्यांनी कारागृहाच्या बाहेर विक्रीसाठी ठेवला आहे आणि नागरिकांकडून त्याला चांगला प्रतिसाद मिळत असल्याचं आमच्या प्रतिनिधींनी सांगितलं आहे.

-----------------------------------------------

**समृद्धी महामार्ग**

हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे महाराष्ट्र समृद्धी महामार्गावर गँट्री म्हणजेच धातूच्या मोठ्या चौकटी उभारण्याचं काम सुरु होणार आहे. या तांत्रिक कामासाठी पाच दिवस वाहतुकीत बदल करण्यात येणार असल्याची माहिती प्रशासनाने दिली आहे. उद्यापासून १३ तारखेपर्यंत अमरावती जिल्ह्यातल्या धामणगाव - चांदुर - नांदगाव खंडेश्वर या मार्गावरील वाहतूक काही वेळेस तात्पुरती थांबवली जाऊ शकते, त्यामुळे प्रवाशांनी प्रवासाचं नियोजन योग्य प्रकारे करावं आणि महामार्ग कर्मचाऱ्यांच्या सूचनांचं पालन करावं, असं आवाहन करण्यात आलं आहे.

-----------------------------------------------

**ज्ञानरंजन निधन**

प्रसिद्ध साहित्यिक ज्ञानरंजन यांचं काल मध्यप्रदेशामधल्या जबलपूर इथं निधन झालं. ते ९० वर्षांचे होते. काल सकाळी प्रकृती अस्वास्थ्यामुळे त्यांना रुग्णालयात दाखल करण्यात आलं होतं, मात्र उपचारादरम्यान रात्री त्यांची प्राणज्योत मालवली. महाराष्ट्रातल्या अकोला इथं २१ नोव्हेंबर १९३६ ला ज्ञानरंजन यांचा जन्म झाला. शिक्षण आणि नोकरीनिमित्त महाराष्ट्र, राजस्थान, दिल्ली, मध्यप्रदेश आणि उत्तरप्रदेशात त्यांनी आपलं जीवन व्यतित केलं. ज्ञानरंजन यांचे अनेक कथासंग्रह प्रसिद्ध असून 'कबाडखाना' या त्यांच्या पुस्तकामुळे त्यांना विशेष ओळख मिळाली. त्याचप्रमाणे 'पहल' या मासिकाचं संपादन त्यांनी अनेक वर्षं केलं. साहित्य भूषण,

मध्यप्रदेशाच्या साहित्य परिषदेचा पुरस्कार, शिखर पुरस्कारासह ते अनेक पुरस्कारांचे मानकरी आहेत.

-----------------------------------------------

**राईस मिलवर छापा**

महसूल विभागाच्या पथकानं काल भंडारा जिल्ह्यात एका राईस मिलवर छापा घालून रेती वाहतूक करणारे १७ ट्रक जप्त केले. वरठी मोहगाव देवी इथं असलेल्या जय गुरुदेव राईस इंडस्ट्री इथं अवैध रेती वाहतुकीसाठी वापरले जाणारे ट्रक लपवून ठेवल्याची माहिती मिळाली होती.

-----------------------------------------------

**मलेशिया बॅडमिंटन**

क्वालालंपूर इथं सुरू असलेल्या मलेशिया खुल्या बॅडमिंटन स्पर्धेत भारताच्या पी व्ही सिंधुने उपांत्यपूर्व फेरीत प्रवेश केला आहे. उपांत्य फेरीत सिंधुचा सामना चीन किंवा जपानच्या खेळाडूशी होईल. त्याआधी भारताच्या आयुष शेट्टीला चीनच्या शी युकी याच्याकडून पराभव पत्करावा लागला.

-----------------------------------------------

**राष्ट्रीय आढावा बैठक**

MSU अर्थात मेट्रोपॉलिटन सर्वेलन्स युनिट ची राष्ट्रीय आढावा बैठक दिनांक ६ आणि ७ जानेवारी रोजी नागपूर येथे पार पडली. या बैठकीत देशभरातील २० MSU च्या कार्यप्रगतीचा आढावा घेऊन शहरी सार्वजनिक आरोग्य व्यवस्थेच्या बळकटीकरणावर चर्चा करण्यात आली. बैठकीत नागपूर MSU च्या सर्वोत्तम कार्यपद्धतींचे सादरीकरण करण्यात आलं तसच रिअल-टाइम रोग सर्वेक्षण आणि जलद प्रतिसाद प्रणालीवर भर देण्यात आला. शहरी भागात रोग नियंत्रण अधिक प्रभावी करण्यासाठी तंत्रज्ञानाधारित समन्वित यंत्रणा मजबूत करण्यावर एकमत झालं.

-----------------------------------------------

**हवामान**

विदर्भात आज भंडारा आणि गोंदिया जिल्ह्यात 10 अंश सेल्सिअस इतक्या सर्वात कमी किमान तापमानाची नोंद करण्यात आली आहे. त्या पाठोपाठ नागपूर आणि गडचिरोली जिल्ह्यात 10 पूर्णांक 6, यवतमाळ इथं 11 अंश सेल्सिअस तर वर्धा इथं 11 पूर्णांक 5 अंश सेल्सिअस इतकं किमान तापमान नोंदवण्यात आलं. आगामी

काही दिवस हवामान कोरडं राहणार असल्याचा अंदाज नागपूरच्या प्रादेशिक हवामान विभागाने दिलाय.

-----------------------------------------------

**दीक्षांत समारंभ**

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाचा ११३वा दीक्षांत समारंभ उद्या दुपारी ३ वाजता ऑडिटोरियम हॉल, नॅशनल फायर सर्विस कॉलेज राजनगर, इथं संपन्न होणार आहे. या समारंभात एकूण ६१ हजार ८७१ विद्यार्थ्यांना पदवी आणि पदविका प्रदान करण्यात येणार असून २७९ संशोधकांना आचार्य पदवीने सन्मानित करण्यात येणार आहे.

-----------------------------------------------